**फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ८४/२०२५ मधील निशाणी १ वरील आदेश**

**CNR NO.MHSN070014752025**

**सतीश शिवाजी कोळी वि महाराष्ट्र सरकार**

सदरचा अर्ज अर्जदार सतीश शिवाजी कोळी यांनी भारतीय नागरी सुरक्षा संहिता ५०३ अन्वये कवठेमहांकाळ पोलीस ठाणे यांनी गुन्हा नोंद क्रमांक ४७०/२०२५ मध्ये जप्त केलेले चारचाकी अल्टो वाहन ज्याचा नोंदणी क्रमांक एमएच १० एजी ११९८ सुपुर्तनाम्यावर परत मिळण्याकरता दाखल केलेला आहे. सदर अर्जाचे पृष्ठ्यर्थ अर्जदार यांनी शपथपत्र दाखल केले आहे.

२. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार सदरचे वाहन कवठेमहांकाळ पोलीस ठाणे यांनी गुन्हा नोंद क्रमांक ४७०/२०२५ मध्ये जप्त केले आहे. सदरचे वाहनाचा वापर अर्जदार हे स्वतःच्या घरगुती कामांसाठी करीत आहेत. प्रस्तुतचे वाहन पोलीस ठाण्यात पडुन राहिल्यास विनावापरामुळे त्याचे तत्सम पार्ट खराब होवुन अर्जदारचे अतोनात नुकसान होणार आहे. अर्जदार हे न्यायालय सांगेल त्या अटींची पुर्तता करण्यास तयार आहेत. म्हणुन सदर वाहनाचा ताबा सुपुर्तनाम्यावर त्यास मिळावा अशी विनंती केली आहे.

३. सदर अर्जावर सरकारी अभियोक्ता व कवठेमहांकाळ पोलीस ठाण्याचे तपासी अधिकारी यांचे म्हणणे मागविण्यात आले. प्रस्तुत अर्जास कवठेमहांकाळ पोलीस ठाण्याचे तपासी अधिकारी यांनी त्यांचे म्हणणे नि.क्र. ५ अन्वये सादर केले आहे. सदरचा गुन्हा गंभीर स्वरुपाचा आहे. सदरचे गुन्हयातील वाहन मूळ मालकास परत केल्यास ते वाहन पुन्हा तशाच प्रकारच्या गुन्हयात वापरण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे. प्रस्तुत अर्जास सहा. सरकारी अभीयोक्ता यांनी त्यांचे म्हणणे नि.क्र. ६ अन्वये सादर केले आहे. सदरचे वाहन पुराव्यासाठी अत्यंत महत्वाचे आहे. अर्जदार सदर वाहनाचा पुन्हा अशाच

प्रकारच्या गुन्हयामध्ये वापर करण्याची दाट शक्यता आहे. तसेच वाहनाची विक्री करण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती त्यांनी केली आहे.

४. अर्ज, म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्हीही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अर्जदार यांनी आपल्या अर्जातील कथनाला पुष्टी देण्यासाठी अभीलेखावर जप्त वाहन चारचाकी अल्टो वाहन ज्याचा नोंदणी क्रमांक एमएच १० एजी ११९८ चे नोंदणीप्रमाणपत्र दाखल केले आहे. सदर नोंदणीप्रमाणपत्राचे अवलोकन केले असता अर्जदार हे जप्त वाहनाचे नोंदणीकृत मालक असल्याचे दिसुन येते. तसेच अर्जदाराव्यतिरिक्त इतर कोणीही सदरच्या वाहनाचा ताबा मागितलेला नाही.

५. सरकारी अभीयोक्ता व तपासी अधिकारी यांनी वाहन अर्जदारास परत केल्यास अर्जदार सदर वाहनाचा पुन्हा तशाच प्रकारचा गुन्हा करण्यासाठी वापर करण्याची शक्यता नाकारता येत नाही, तसेच सदर वाहनाची विक्री करण्याची शक्यता नाकारता येत नाही असा आक्षेप घेतला आहे. अभीयोग पक्षाचा आक्षेप विचारात घेता अर्जदार यांच्यावर जप्त वाहनाचा अंतरिम ताबा देतांना अर्जदार यांच्यावर अटीं व शर्ती लादणे न्याय्य होणार आहे. प्रस्तुत गुन्हयामध्ये आजअखेर दोषारोपपत्र दाखल झालेले नाही. त्यामुळे दोषारोपपत्र दाखल होवून पुराव्याकामी सदर वाहनाची आवश्यकता भासण्यास बराच कालावधी लागणार आहे. दरम्यानच्या काळात सदर वाहन कवठेमहांकाळ पोलीस ठाण्यात पडुन राहिल्यास ते खराब होण्याची शक्यता आहे. तसेच प्रस्तुत अर्जदार हे गु.र.क्र.४७०/२०२५ मधील आरोपी नाहीत. त्यामुळे अर्जदार यांच्यावर योग्य त्या अटी व शर्ती ठेवून सदर वाहनाचा अंतरिम ताबा अर्जदारास देणे योग्य ठरते. यास्तव खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे-

## <u>आदेश.</u>

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. पोलीस निरीक्षक, कवठेमहांकाळ पोलीस ठाणे यांनी चारचाकी अल्टो वाहन ज्याचा नोंदणी क्रमांक एमएच १० ए जी ११९८ चा अंतरिम ताबा अर्जदार सतीश शिवाजी कोळी, राहणार घाटनांद्रे, ता. कवठेमहांकाळ, जि.सांगली यांना रक्कम रुपये ५,००,०००/- ( पाच लाख रुपये) चा सुपुर्तनामा (Indemnity Bond) लिहुन दिल्यावर व त्याची योग्य ओळख पटवुन दिल्यानंतर, खालील अटींवर देण्यात यावा-

**अ.** अर्जदारने सदर गुन्ह्याचा अंतिम निकाल होईपावेतो सदरचा मुद्देमाल कोणत्याही मार्गे हस्तांतर करु नये अगर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करु नये.

**ब.** अर्जदारने न्यायालय हुकुम करेल त्यावेळी सदरचा मुद्देमाल न्यायालयात हजर करणेचा आहे.

**क.** पोलीस निरीक्षक कवठेमहांकाळ पोलीस ठाणे यांनी अर्जदारच्या खर्चावर सदर वाहनाचे छायाचित्र काढुन त्याचा पंचनामा करावा. सदर छायाचित्र, पंचनामा व बंधपत्र दोषारोपपत्रासोबत दाखल करावे.

KADAM NUTAN SACHIN

Digitally signed by KADAM NUTAN SACHIN
Date: 2026.03.13 07:19:20 +0530

दिनांक १२.०३.२०२६ ( श्रीमती एन. एस. कदम )

न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग

कवठेमहांकाळ. कवठेमहांकाळ.

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer - H.P.Haridas
Court - CJJD and JMFC, Kavathemahankal.
Date - 12.03.2026
Order signed by the
Presiding Officer on -12.03.2026
Order uploaded on -13.03.2026